("सोबत:-राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेतील त्रुटींची पुर्तता करणेबाबत वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र. अंनियो-२०२०/प्र क्र.३७/सेवा-४,दि.०४डिसेंबर २०२० ची प्रत)

---

महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण-२०२०/(प्र.क्र.१११/२०२०)/आ.(क्षेप्र)

जलसंपदा विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड,
मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दि.२२ डिसेंबर २०२०

प्रति,

महासंचालक,मेरी,नाशिक,
सर्व कार्यकारी संचालक,
जसंवि च्या अधिपत्याखालील सर्व मुख्य अभियंते,
जसंवि च्या अधिपत्याखालील सर्व परिमंडळीय अधिक्षक अभियंते.

यांना कळविण्यात येते की,शासन निर्णय,वित्त विभाग,दि.२७.८.२०१४ च्या शासन निर्णयान्वये दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर १ ची अंमलबजावणी दि.०१.४.२०१५ पासून करण्याची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरण (PFRDA) यांनी दि.२४.९.२०२० रोजी आयोजित केलेल्या आढावा बैठकीत, सभासद नोंदणीस विलंब,नॉन आयआरए प्रान, निरंक जमा प्रान,अंशदान उशीरा वसूल करणे,सभासदांचा वैयक्तिक तपशील अपूर्ण असणे,अंतिम परताव्याची प्रकरणे उशीरा पाठविणे इ. कारणांमुळे, राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या सभासदांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचे फायदे मिळण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आणले आहे. अशा प्रकारच्या विलंबामुळे सभासदांकडून तक्रारी येत आहेत. कोणत्याही कारणावरून भविष्यात त्यांचेकडून व्याजाची किंवा आर्थिक लाभाची मागणी झाल्यास त्याचा आर्थिक भार शासनावर पडणार आहे.तसेच यातून अनेक न्यायालयीन प्रकरणेदेखील उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२. त्या अनुषंगाने राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरिता वित्त विभागाने शासन परिपत्रक दि.४ डिसेंबर २०२० अन्वये आवश्यक सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर शासन निर्णयातील सूचनांचे अवलोकन करावे. त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच आपले कार्यालयांतर्गत सर्व विभागीय/उपविभागीय कार्यालयांना वित्त विभागाने दिलेल्या सूचना आपल्या सतरावरून देण्यात याव्यात. तसेच त्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यात यावे. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांचा संगणक सांकेतांक क्र.२०२०१२०४१७०६१९१५०५असा आहे.

सहपत्र : वरीलप्रमाणे

(विनायक लवटे)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत :-आ.(क्षेप्र)कार्यासन संग्रहार्थ.

राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेतील त्रुटींची
पूर्तता करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
परिपत्रक क्र.अंनियो-२०२०/प्र.क्र.३७/सेवा-४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ४ डिसेंबर, २०२०

वाचा :

१) शासन निर्णय क्रमांक : अंनियो-१००५/१२६/सेवा ४, दिनांक ३१.१०.२००५.
२) शासन निर्णय क्रमांक : अंनियो-२०१२/प्र. क्र. ९६/सेवा ४, दिनांक २७.०८.२०१४.
३) शासन निर्णय क्रमांक : अंनियो-२०१५/(NPS)/प्र.क्र. ३२/सेवा ४, दिनांक ०६.०४.२०१५.
४) शासन परिपत्रक क्रमांक : अंनियो-२०१७/प्र.क्र. २६/सेवा ४, दिनांक २८.०७.२०१७.
५) शासन परिपत्रक क्रमांक : अंनियो-२०१७/प्र.क्र. २८/सेवा ४, दिनांक २८.०७.२०१७.
६) शासन परिपत्रक क्रमांक : अंनियो-२०१९/प्र.क्र.४५०/सेवा ४, दिनांक ०४.०१.२०२०.

**प्रस्तावना:-**

उपरोक्त संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेच्या स्तर १ ची अंमलबजावणी दिनांक ०१.०४.२०१५ पासुन करण्याची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. तसेच आहरण व संवितरण अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या ही दर्शविल्या आहेत.

सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत निवृत्तिवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरण (PFRDA) यांनी दिनांक २४.०९.२०२० रोजी आयोजित केलेल्या आढावा बैठकीत -सभासद नोंदणीस विलंब॰, -नॉन आयआरए प्रान॰, -निरंक जमा प्रान॰, सभासद नोंदणी झाली आहे. परंतु -अंशदान उशीरा वसुल करणे॰, सभासदांचा -वैयक्तिक तपशिल॰ अपूर्ण असणे, राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजने अंतर्गत -अंतिम परताव्याची प्रकरणे उशिरा पाठविणे॰, इ. मुळे सभासदांना राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेचे फायदे मिळण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आणले आहे.

अशा प्रकारच्या विलंबामुळे सभासदांकडून तक्रारी येत आहेत. कोणत्याही कारणावरुन भविष्यात त्यांच्याकडून व्याजाची अथवा आर्थिक लाभाची मागणी झाल्यास त्याचा आर्थिक भार शासनावर पडणार आहे. तसेच यातून अनेक न्यायालयीन प्रकरणेदेखील उद्भवण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता खालील प्रमाणे शासन परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन परिपत्रक:-**

१) सभासद नोंदणीस विलंब **(Delay in Subscriber registration):-**

शासन निर्णय वित्त विभाग दि.२८.०७.२००७ नुसार दिनांक ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत रुजु झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या लगतच्या महिन्यापासुन त्यांची राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेच्या अंशदानाची कपात सुरु होणे आवश्यक आहे. परंतु असे निदर्शनास आले आहे की, प्रान क्रमांक विहित कालावधीत प्राप्त करुन घेतले जात नाहीत तसेच काही कर्मचाऱ्यांना प्रान ३ महिन्यापेक्षा जास्त कालावधी नंतर प्राप्त झाले आहेत.

२) दिनांक ३०.०९.२०२० अखेरचे नॉन आयआरए प्रान **(Non-IRA PRANs):-**

राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीवर काही कर्मचाऱ्यांचे प्रान क्रमांक Non- IRA active आहेत असे दिसुन येते. सदर कर्मचाऱ्यांचे 'CSRF' आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कोषागार कार्यालयामार्फत मे.'एन.एस.डी.एल.' यांचे सेवा सुविधा केंद्रावर पाठवून सदर प्रान 'आय.आर.ए.' करुन घेण्यात यावेत. तसेच काही कर्मचाऱ्यांचे प्रान हे -Non-IRA deactive॰ आहेत. सदर कर्मचाऱ्यांची शासकीय सेवा समाप्त झाली आहे किंवा कसे याबाबत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी खात्री करावी. सेवा समाप्त झाली असल्यास सेवा समाप्तीचा आदेश कोषागार कार्यालयाला द्यावा. दिनांक ३१.०३.२०१५ रोजी अथवा त्यापुर्वी कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त झाली असल्यास त्यांच्या खात्यातील रकमांचे कोषागार कार्यालयांकडून 'ERM' करावे व सदर रक्कम शासन लेख्यात जमा करण्यात यावी. तद्नंतर संबंधित कर्मचाऱ्याच्या परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना (DCPS) परताव्याबाबत शासन निर्णय वित्त विभाग दिनांक १२.११.२०१० व शासन परिपत्रक वित्त विभाग दिनांक २८.०७.२०१७ नुसार कार्यवाही करावी. तसेच ज्या कर्मचाऱ्यांची सेवा समाप्ती दिनांक ०१.०४.२०१५ रोजी अथवा त्यानंतर झाली असेल त्याबाबतीत -Exit Withdrawal॰ ची कार्यवाही करावी. ज्या कर्मचाऱ्यांचे एका पेक्षा जास्त -प्रान॰ आहेत त्यांचा एकच -प्रान॰ सुरु ठेवून इतर -प्रान॰ बंद करण्याची कार्यवाही करावी.

३) **"निरंक" जमा प्रान (Nil Credit):-**

अ) राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेत काही सभासदांच्या राष्ट्रीय निवृत्तिवेतन खात्यावर खाते उघडल्यापासुन अद्याप पर्यंत कोणतीही वर्गणी जमा झालेली नाही. अशा सभासदांची यादी मे.'एन.एस.डी.एल.' कडून राज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालयामार्फत कोषागार कार्यालयांना दरमहा पाठविली जाते. कोषागार अधिकाऱ्यांनी सदर यादी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी, अपर कोषागार अधिकारी (लेखापरिक्षा) व उपकोषागार अधिकारी यांना पाठवावी. अपर कोषागार अधिकारी (लेखापरिक्षा) आणि उपकोषागार अधिकारी यांनी संबंधित कार्यालयांची वेतन देयके पारित करताना सदर मुद्दयांची पुर्तता झाल्याची खात्री करुनच माहे जानेवारी २०२१ पासुनची वेतन देयके पारित करावीत. ज्या कर्मचाऱ्यांची शासकीय सेवा समाप्त झाली आहे, तसेच दुबार -प्रान॰ क्रमांक प्राप्त झाल्यामुळे एका -प्रान॰ क्रमांकावर रक्कम 'निरंक' आहे अशा कर्मचाऱ्यांची यादी -प्रान॰ क्रमांकासह कोषागार कार्यालयास कळवून सदर 'प्रान' क्रमांक रद्द करुन घ्यावेत. तसेच इतर काही कारणामुळे "निरंक" जमा असल्यास आहरण व संवितरण अधिकारी यांनी उचित कार्यवाही करावी.

आ) तसेच काही खात्यावर वर्गणी जमा झाली होती तथापि सेवा समाप्ती अथवा इतर कारणांमुळे पुर्ण रक्कम काढून घेण्यात आल्यामुळे सदर खात्यावर शिल्लक 'शुन्य' आहे. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी अशी खाती सुध्दा बंद करण्याची कार्यवाही करावी.

४) नामनिर्देशन नसलेले 'प्रान' **(PRANs without Nomination details):-**

'प्रान' खात्यावर आवश्यक नामनिर्देशन नसल्यास खातेधारकाच्या पश्चात वारसांना कागदपत्रांची पूर्तता करण्यास जादा कालावधी लागतो व त्यामुळे राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेचे फायदे मिळण्यास विलंब होतो. अधिदान व लेखा अधिकारी / कोषागार अधिकारी यांना ईमेलद्वारे पाठविलेल्या यादीतील ज्या सभासदांचे नामनिर्देशन राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीत भरलेले नाही त्या सभासदांचे एस-२ फॉर्म संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी मे.'एन.एस.डी.एल.' यांचे सेवा सुविधा केंद्रावर सादर करण्यासाठी अधिदान व लेखा कार्यालय अथवा कोषागार कार्यालयाकडे दि.१५ जानेवारी २०२१ पर्यंत सुपूर्द करावे.

५) मोबाईल क्रमांक नसलेले प्रान (PRANs without Mobile no.) :-

राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीत मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी भरण्यात आलेले नाहित, त्यांची माहिती अद्ययावत करण्यासाठी अशा सभासदांची यादी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कोषागार कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी. सबंधित सभासदांकडून 'मोबाईल क्रमांक', 'वैयक्तिक ई-मेलआयडी' इत्यादी प्राप्त करुन घेऊन आहरण संवितरण अधिकाऱ्यांनी राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीमध्ये नोंद घ्यावी. केलेल्या कार्यवाहीची पुर्तता यादी जिल्हा कोषागार कार्यालयास सादर करावी.

६) बँक तपशिल नसलेले प्रान (PRANs without Bank details) :-

सभासदांनी सेवा कालावधी दरम्यान केलेले अंशत: आहरण अथवा सेवासमाप्तीनंतर केलेले अंतिम आहरण इत्यादी रकमा त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येतात. अशा प्रकरणी प्रदानातील विलंब टाळण्यासाठी ज्या सभासदांचे बँक, शाखा व खाते क्रमांक राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीत भरलेले नाही त्या सभासदांचा तपशिल आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी अद्ययावत करावा.

उपरोक्त मुद्दा क्रमांक ४, ५, ६ नुसार सभासदांचा तपशिल आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी सेवार्थ प्रणालीत अद्ययावत करुन 'एस-२' फॉर्मची प्रिंट काढावी. सदर माहिती मे.'एन.एस.डी.एल.' यांच्या प्रणालीतही आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी अद्ययावत करावी आणि 'एस-२' फॉर्म अधिदान व लेखा कार्यालय / कोषागार कार्यालयाकडे मंजुरीसाठी सादर करावा.

७) आहरण व संवितरण अधिकारी यांचा लॉगीन तपशील (Login details of DDOs on functionally available in the NSDL system):-

राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीची माहिती तसेच अधिनस्त सभासदांची **माहिती आहरण व संवितरण** अधिकाऱ्यांना तात्काळ मिळण्यासाठी मे.'एन.एस.डी.एल.' यांनी **प्रत्येक आहरण व संवितरण** अधिकाऱ्यांना 'लॉगिन आयडी' दिला आहे. तथापि, एकुण १२९१९ नोंदणीकृत **आहरण व संवितरण** अधिकारी यांच्यापैकी १२०३८ आहरण व संवितरण अधिकारी यांनी अद्यापही मे.'एन.एस.डी.एल.' प्रणालीत लॉगिन केलेले नाही. तर फक्त २१४ आहरण व संवितरण अधिकारी यांनी मागील तीन महिन्यात सदर प्रणालीत 'लॉगिन' केल्याचे दिसून येते. यावरुन आहरण व संवितरण अधिकारी प्रणालीवरील कार्यवाहीबाबत गंभीर नसल्याचे निदर्शनास येते. सदरची बाब अत्यंत गंभीर आहे. तरी

सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना वेळोवेळी मे.'एन.एस.डी.एल.' प्रणालीत लॉगिन करुन सभासदांची संबंधित माहिती तपासावी.

८) अंशत: रक्कम काढणे प्रलंबित प्रकरणे (Number of pending partial exit cases)

माहे ऑगस्ट २०२० अखेर अंशत: रक्कम काढण्याची ९३ प्रकरणे प्रलंबित असल्याचे प्रणालीवरील माहितीतून दिसून येत आहे. तरी सदर प्रकरणे त्वरित निकाली काढण्याकरिता आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

९) राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेतून बाहेर पडणे (Number of pending online exit cases):-

माहे ऑगस्ट २०२० अखेर सेवेतून बाहेर पडलेल्या सभासदांची पूर्ण रक्कम काढण्याची (online final exit withdrawal) १९४ प्रकरणे प्रलंबित असल्याचे प्रणालीवरील माहितीतून दिसुन येत आहे. अशा प्रकरणांतील त्रुटी प्राधान्याने पूर्ण करुन सभासदांना रक्कम हस्तांतरित करण्याची कार्यवाही आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी त्वरित पूर्ण करावी.

**१०) नियत वयोमर्यादा सेवानिवृत्ती प्रकरणात दावा क्रमांक प्राप्त परंतू प्रत्यक्ष कार्यवाही नाही** (Claim IDs **generated but subscribers yet to be superannuated):-**

माहे ऑगस्ट २०२० अखेर दावा क्रमांक प्राप्त (Claim ID generate) झालेली परंतु अंतिम परताव्याची (online final exit withdrawal) ची कार्यवाही सुरु न झालेली १६४ प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिसुन येत आहे. सदर प्रकरणांपैकी ९३ प्रकरणी ३ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी उलटून गेल्याचे दिसते. या प्रकरणांत सुध्दा वरील प्रमाणे प्राधान्याने कार्यवाही करुन प्रकरणे त्वरित निकाली काढण्यात यावीत.

**११) नियत वयोमर्यादा सेवानिवृत्ती प्रकरणात सेवानिवृत्ती नंतर प्रकरण सादर न करणे** (Non-Initiation of **online withdrawals even after superannuation):-**

माहे ऑगस्ट २०२० अखेर सेवानिवृत्त झालेल्या तथापि अंतिम परतावा (online exit withdrawals) ची कार्यवाही अद्यापही सुरु न झालेली अशी ५४२ प्रकरणे असल्याचे दिसून येत आहे. सदर प्रकरणांपैकी ४२९ प्रकरणात ३ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लोटलेला आहे. तर त्यातील २२२ प्रकरणे १ वर्षा पेक्षा जास्त कालावधी पासून प्रलंबित आहेत ही अत्यंत गंभीर बाब आहे. तरी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी सदर प्रकरणी प्राधान्याने कार्यवाही करुन प्रकरणे त्वरित निकाली काढावीत.

१२) मंजूर ऑनलाईन प्रकरणांत कागदपत्रे सादर नसलेली प्रकरणे (Non submission of document, post authorization of online withdrawal):-

माहे ऑगस्ट २०२० अखेर अंतिम प्रदानाबाबतची ऑनलाईन कार्यवाही पूर्ण करुन देखील संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून आवश्यक ती कागदपत्रे कोषागारात सादर न केल्यामुळे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या ४७६ एवढी आहे. सदर प्रकरणांपैकी ३६४ प्रकरणी ३ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लोटलेला असून त्यापैकी २३७ प्रकरणे १ वर्षा पेक्षा जास्त कालावधी पासून प्रलंबित आहेत. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी सर्व मुळ कागदपत्रे सादर करुन प्रकरणे १५ जानेवारी २०२१ पर्यंत निकाली काढावीत.

१३) नियत सेवानिवृत्ती मधील विलंब झालेली प्रकरणे (Delay in subscriber exit under superannuation data):-

अनेक सभासदांची नियत सेवा निवृत्ती झाल्यानंतर राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीत (NPS) अंतिम प्रदानाबाबतची कार्यवाही करण्यास विलंब झाल्याचे दिसून आले आहे. तरी सदर प्रकरणी प्राधान्याने कार्यवाही करुन प्रकरणे त्वरित निकाली काढण्यात यावीत.

१४) वरील राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेच्या बाबींव्यतिरिक्त दिनांक ०१.११.२००५ ते ३१.०३.२०१५ पर्यंत राबविण्यात आलेल्या परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेतील दि.३१.०३.२०१५ पुर्वी सेवा समाप्त झालेल्या सभासद कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेतील जमा रकमेचा परतावा देण्याबाबत राज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालयाने शासनाच्या निर्देशनास आणले आहे. त्याबाबत वित्त विभागाने दि. ०४.०१.२०२० रोजी परिपत्रक काढले आहे. **परंतु काही सभासदांची** परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेतील परताव्याची **प्रकरणे अद्याप राज्य अभिलेख देखभाल** अभिकरण कार्यालयास सादर करण्यात आलेली नाहीत. काही **प्रकरणे सादर झालेली आहेत, परंतु** त्यात असलेल्या त्रुटीं कळविण्यात येऊनही त्याची पुर्तता करण्यात आलेली नाही. आहरण व संवितरण अधिकारी यांनी अशी परतावा प्रकरणे तातडीने सादर करुन संबंधितांचे प्रदान करावे. त्याबाबत कोणत्याही सभासदांची/ त्यांच्या वारसदारांची तक्रार आल्यास त्यास संबंधित आहरण व संवितरण अधिकारी स्वत: जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

उपरोक्त नमूद काही बाबींमुळे संबंधितांच्या प्रान क्रमांकावर अंशदानाची रक्कम विहित वेळेत जमा होत नाही आणि राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) सभासदांच्या तक्रारी उद्भवतात. तसेच

त्यांच्या अंतिम देय रकमेवर परिणाम होतो. हे टाळण्याकरिता माहे जानेवारी, २०२१ च्या वेतनापासुन सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी दरमहाच्या वेतन देयका सोबत पुढील प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

<u>प्रमाणपत्र</u>

**"प्रमाणित करण्यात येते की, शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो-१००७/१८/सेवा-४,दिनांक ७ जुलै, २००७ मधील परिच्छेद क्र. ६ (ड) अन्वये**

1) **या देयकात वेतन आहरीत केलेल्या ज्या कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना लागू आहे त्यांचे प्रान क्रमांक प्राप्त झाले असुन त्याच्या वेतनातून योग्य दराने राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेची वर्गणी कपात करण्यात आली आहे.**
2) **ज्या कर्मचाऱ्यांचे 'प्रान' 'नॉन आयआरए' होते असे सर्व 'प्रान' 'आयआरए' करुन घेण्यात आलेले आहेत.**
3) **राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेत कपात केलेल्या सर्व सभासदांचे नामनिर्देशन, मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी तसेच बँकेचा तपशिल प्राप्त करुन घेऊन राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीत अद्ययावत करण्यात आले आहेत.**
4) **आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन दिलेल्या राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीच्या डॅश बोर्डवर या महिन्यात लॉगिन केले आहे व सभासदांची माहिती तपासली आहे."**

**उपरोक्त प्रमाणपत्र वेतन देयकासोबत सादर न केल्यास माहे फेब्रुवारी २०२१ (देय मार्च २०२१) पासुनची वेतन देयके स्विकारण्यात येणार नाहीत.**

वरील मुद्दयांची आणि राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनातंर्गत सर्व मुद्दयांची पुर्तता करण्याकरिता अधिदान व लेखा अधिकारी/ सर्व कोषागार अधिकारी यांनी नोव्हेंबर/ डिसेंबर २०२० मध्ये सर्व संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे शिबिर / बैठक आयोजित करावे. सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी सदर बैठकीस उपस्थित राहून प्रलंबित मुद्दयांची पुर्तता करावी. अधिदान व लेखा अधिकारी/ कोषागार अधिकाऱ्यांनी अशा बैठकांचा तपशिलवार अहवाल विभागीय सहसंचालक लेखा व कोषागारे यांचे मार्फत संचालक (लेखा व कोषागारे) यांना जानेवारी २०२१ पर्यंत सादर करावा.

वरील सर्व मुद्दयांची (मुद्दा क्र.१४ वगळून) सभासदनिहाय/ आहरण व संवितरण अधिकारीनिहाय यादी अधिदान व लेखा अधिकारी व कोषागार अधिकारी यांना राज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालयाकडून

विभागीय सहसंचालक लेखा व कोषागारे यांचे मार्फत पुरविण्यात येईल. सर्व विभागांनी त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून विहित कार्यवाही होईल हे पहावे. तसेच याबाबत पुचराई करणाऱ्या आहरण व संवितरण अधिकारी यांचेविरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२०१२०४१७०६१९१५०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=6015444fa7d58a83f4a54c431476b5da1e3486ba7984e9f793b66f7249aaa9c1a, postalCode=400032, street=Y-5/66,GOVERNMENT COLONY,MUMBAI,
serialNumber=d4994742192306fcc1dea8aedd381063950651 9fa6572b919767b98b04e905a18, ou=FINANCE DEPUTY SECRETARY, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=INDRAJEET SAMBHAJI GORE
Date: 2020.12.04 17:11:03 +05'30'

**(इंद्रजित सं.गोरे)**
**शासनाचे उप सचिव**

**प्रति,**

१) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य.
३) मा.राज्यपालांचे सचिव.
४) मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव.
५) मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
६) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
७) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
८) मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.
९) प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
१०) प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
११) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१२) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
१५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१६) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१७) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१८) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.
१९) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२०) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.
२१) सर्व विभागीय आयुक्त.